**P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

**प्रेसनोट** **दिनांक – ०७/११/२०२४**

## “विधानसभा निवडणूक निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस सज्ज”

मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी विधानसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर सदरची निवडणुक ही भयमुक्त व पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पाडता यावी यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणेसाठी शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आले आहेत.

विधानसभा निवडणूक २०२४ चे पार्श्वभुमीवर आचारसंहिता लागु झालेपासुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत अवैधरित्या वाहतुक करीत असलेली एकुण ७९,६६,७८०/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आलेली असून ७७,७१,६०८ रु किमतींची १,६०,०२२ लीटर अवैध दारुसाठा जप्त करणेत आलेला आहे. मोठया प्रमाणात अंमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला असून ज्यामध्ये १६,९०,०००/- रुपये किंमतीचा ३३ किलो ०८ ग्रॅम गांजा, १७,२०,०००/- रुपये किमतींची १७२ ग्रॅम एम.डी, ३ ग्रॅम वजनाची ५,४०० किंमतीचे अफीम जप्त करण्यात आलेले आहे. तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत मोठया प्रमाणावर प्रतिबंधक कारवाई राबविणेत येत असून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील तसेच विविध कायदयाअंतर्गत आतापर्यंत एकुण १,४३८ व्यक्तींविरोधात प्रतिबंधक कारवाई करणेत आलेले आहे. ६ गुन्हेगारी टोळयातील २८ आरोपींच्या विरुध्द मोका कायदयान्वये कारवाई करण्यात आलेली असुन ६ आरोपींना स्थानबध्द करणेत आलेले आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत निवडणुकींचे अनुषंगाने तपासणीकरीता १७ फलॉईग स्कॉड तयार करण्यात आलेले असुन त्याकरिता ३६ अधिकारी व १०२ अमंलदार नेमण्यात आलेले आहेत व स्टॅटिक सर्व्हिलन्सची १४ पथके तयार करण्यात आलेली असुन त्याकरीता ८४ अंमलदार यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. मोठया प्रमाणावर कोंबिंगदवारे गुन्हेगारांची व नाकाबंदीदवारे वाहनांची कसुन तपासणी करणेत येत आहे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हददीत सार्वजिक विधानसभा निवडणुक २०२४ ही अतिशय शांततेत व निर्विघ्नपणे पार पाडावी व कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ नये याकरिता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयाचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, पोलीस सह आयुक्त डॉ.शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयातील पोलीस अधिकारी व अंमलदार अहोरात्र मेहनत घेत आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**